ePaper

# एकनाथ खडसे यांनी पुन्हा भाजपमध्ये यावे; विनोद तावडे



वर्ष - 7 । अंक -39 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।सोमवार, दि. 5 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- निधीविना अडले पुरंदर विमानतळाचे 'टेक ऑफ'!
- महापालिकेचा अजब कारभार!

# होर्डिंगसह झाडेही धोकादायक!

## आपत्ती व्यवस्थापन : वादळी पावसामुळे 16 झाडे पडली

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहर परिसरातील होर्डिंगसह जुनी झाडेही धोकादायक ठरत असल्याचे रविवारी (ता. ४) स्पष्ट झाले. वादळी वाऱ्यासह काही भागात झालेल्या जोरदार पावसामुळे तब्बल १६ झाडे उन्मळून पडली. काहींच्या फांद्या पडल्या. त्यात एक महिला किरकोळ जखमी झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. पडलेली झाडे बाजूला करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.**



निगडी-आकुर्डी प्राधिकरणासह यमुनानगर, पुणे-मुंबई महामार्ग, गावठाणांच्या परिसरात जुनी झाडे आहेत. गेल्या आठवड्यात झालेल्या वादळ व पावसामुळे चार ठिकाणी झाडे पडली होती. रविवारी दुपारी दोनच्या सुमारासही जोरदार पाऊस झाला. सोसाट्याचा वाराही होता. त्यामुळे १६ ठिकाणी झाडे पडल्याची घटना घडली. दरम्यान, महिन्यापूर्वी झालेल्या पावसामुळे किवळेत होर्डिंग कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला होता. दोन दिवसांपूर्वी हिंजवडी परिसरातही होर्डिंग कोसळले होते. असे धोकादायक होर्डिंग व झाडे शहर परिसरात अनेक ठिकाणी आहेत. पावसाळ्यापूर्वी त्याबाबत उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

### सकाळपासून ऊन; दुपारी पाऊस

रविवारी सकाळपासूनच कडक ऊन होते. दुपारी दोनच्या सुमारास पावसाला सुरवात झाली. साधारण दोन तास चाललेल्या जोरदार वारा व पावसामुळे झाडे पडली. चारनंतर कडक ऊन पडले. मात्र, त्यानंतर ऊन-सावलीचा खेळ रंगला. पावसामुळे काही भागात पाणी साचल्याने वाहतूक कोंडीही झाली होती.

### इथे पडलीत झाडे

किर्लोस्कर कॉलनी यमुनानगरमध्ये दोन आणि सुदर्शननगर चिंचवड, म्हाळसाकांत कॉलेज आकुर्डी, दळवीनगर, साईबाबा मंदिराजवळ, भगिनी निवेदिता बँकेजवळ भेळ चौक, एचडीएफसी बँकेजवळ प्राधिकरण, ऑर्चिड स्कूलजवळ प्राधिकरण, डीपी रोड जगताप डेअरी पेट्रोल पंपाजवळ, बुद्धविहार भक्तीशक्ती चौक, गंगानगर प्राधिकरण, साई उद्यान संभाजीनगर, बिग इंडिया चौक प्राधिकरण आदी ठिकाणी रविवारी झाडे पडली.

### नुकसान भरपाईची अपेक्षा

गेल्या आठवड्यात झालेल्या वादळ व पावसामुळे एक झाड पडून रिक्षाचे नुकसान झाले होते. महात्मा फुलेनगरमध्येही एक झाड धोकादायक होते. ते काढण्यात आले. मात्र, अशा झाडांमुळे वाहनाचे किंवा घर, दुकानाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मिळावी, अशी अपेक्षा रिक्षाचालकाने व्यक्त केली.

### नागरिकांना आवाहन

- ढगांच्या गडगडाटासह पावसात झाडाखाली आसरा घेऊ नये.
- विजा चमकत असताना मोबाईल, उपकरणे वापरू नये.
- जोरदार वारा, वादळ असल्यास खिडक्या व दरवाजे बंद करावेत.
- जोरदार वारा किंवा विजा चमकत असताना प्रवास टाळावा.
- पाऊस व वादळात दृश्यमानता कमी व रस्ते निसरडे होत असल्याने वाहन सावकाश चालवावे.

### झाडे पडल्यास हेल्पलाइन

| | |
|---|---|
| अ क्षेत्रीय कार्यालय | ९६५७७०७५१२, ७३५००६५९५२ |
| ब क्षेत्रीय कार्यालय | ९९२२३७३४६२, ९७३००३७९०० |
| क क्षेत्रीय कार्यालय | ९६२३४४५७३१, ८८८८८९४६८४ |
| ड क्षेत्रीय कार्यालय | ९९२२९६५९६५ |
| ई क्षेत्रीय कार्यालय | ९८५०८३४००९, ९६२३५५५००० |
| फ क्षेत्रीय कार्यालय | ८००७०१९६१८, ९५९५३९३३२३ |
| ग क्षेत्रीय कार्यालय | ९८५०७०१०८५, ९८५०२९८२३१ |
| ह क्षेत्रीय कार्यालय | ९८२२३३५२७८, ९५२७७७५१०६ |


> वादळ, वारा, पाऊस असताना नागरिकांनी झाडाखाली आश्रय घेऊ नये, विजेचा कडकडाट सुरू असताना मोबाईल फोनचा वापर करू नये. अशा वेळी शक्यतो प्रवास टाळावा. वाहन चालवायचे झाल्यास, त्यांचा वेग कमी असायला हवा.
>
> - ओमप्रकाश बहिवाल, प्रमुख, आपत्ती व्यवस्थापन विभाग,

# पिंपरी-चिंचवड महापालिकेला जलतरण तलाव चालवणे परवडेना?

## पाच तलावांबाबत घेतला खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर चालविण्याचा घेतला निर्णय

। पुणे । महाईन्यूज

**आंतरराष्ट्रीय जलतरण तलावांचा वार्षिक उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याचा दावा करून महापालिकेकडून शहरातील पाच जलतरण तलाव खासगी संस्थांना सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात येणार आहेत.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने जलतरणपटूंना सरावाची सुविधा उपलब्ध व्हावी, नागरिकांना पोहण्याचा आनंद घेता यावा यासाठी केशवनगर, संभाजीनगर, कासारवाडी, पिंपरीगाव, यमुनानगर, पिंपळे गुरव, नेहरूनगर, वडमुखवाडी, भोसरी, मोहननगर, थेरगाव, सांगवी, आकुर्डी या भागांत १३ जलतरण तलावांची उभारणी करण्यात आली आहे. जलतरणपटूंना दर्जेदार प्रशिक्षण घेण्यासाठी तसेच सराव करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहराबाहेर जावे लागते. यासाठी महापालिकेने काही तलाव सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे चालविण्यास देण्याचे ठरवले आहे. तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना महापालिकेच्या एकूण १५ जलतरण तलावांपैकी पाच जलतरण तलाव सार्वजनिक खासगी भागीदारीतून (पीपीपी) तत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात येणार आहेत.

> कासारवाडी, यमुनानगर, पिंपरीगाव, वडमुखवाडी, चऱ्होली असे पाच जलतरण तलाव पीपीपी तत्त्वावर चालविण्यास देण्यात येणार आहेत. उर्वरित तलाव महापालिकेच्या वतीने चालविण्यात येणार आहेत. आकुर्डीतील तलावाची खोली मोठी असल्याने अडचणी येत आहेत. त्यामुळे हा जलतरण तलाव कायमचा बंद केला जाणार आहे.महापालिकेचे पाच जलतरण तलाव पीपीपी तत्त्वावर खासगी संस्थेला चालविण्यास देण्यात येणार आहेत. त्याबाबतची निविदा प्रक्रिया लवकरच केली जाणार आहे.
>
> - मनोज लोणकर, उपायुक्त, क्रीडा विभाग

# निधीविना अडले पुरंदर विमानतळाचे 'टेक ऑफ'!

## पाच हजार कोटी आणायचे कोठून? राज्य सरकारची अनास्था

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळासाठी निधी किती आणि कोणी द्यावा याचा तिढा अद्याप सुटला नसल्याने विमानतळाचे 'टेक ऑफ' होत नसल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. विमानतळासाठी अपेक्षित पाच हजार कोटी रुपये आणायचे कोठून, या अडचणीमुळे तेवढा निधी सरकार देण्यास तयार नसल्याने हे घोडे अडल्याचे सांगितले जात आहे.**



पुरंदर तालुक्यातील पारगाव मेमाणे, मुंजवडी, कुंभारवळण, एखतपूर, वनपुरी, उदाचीवाडी, खानवडी या सात गावांमध्ये विमानतळ होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच जाहीर केले. त्यानंतर जानेवारी महिन्यात फडणवीस यांनी पुरंदर विमानतळासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगून विमानतळावर शिक्कामोर्तब केले होते. विमानतळासाठी २०१७ मध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने (एमएडीसी) प्रस्ताव तयार केला होता. फडणवीस यांनी नव्याने ही जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) सोपविली आहे.

राज्य सरकारने फेब्रुवारीमध्ये पुरंदर विमानतळासाठी नेमका किती निधी लागेल, याची चाचपणी केली. निधी कशा पद्धतीने उभारावा या संदर्भात अभ्यासही केला आहे. निधीमध्ये एमआयडीसी, राज्य सरकार, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका यांचा प्रकल्पांमध्ये नेमका वाटा किती असेल, याबाबत सरकारने पर्यायांवर मंत्रालय पातळीवर चर्चा केली आहे. दरम्यान, विमानतळ उभारणीसाठी हजारो कोटींचा निधी लागणार असल्याने तेवढा भार एकट्याने उचलण्याची तयारी नसल्याचे राज्य सरकारने चर्चेत सांगितले आहे.

त्यामुळे यातील निधीचा सर्वाधिक वाटा ही 'एमआयडीसी'ने उचलणे सरकारला अपेक्षित आहे. त्याबाबत एमआयडीसीकडे यापूर्वी सरकारने विचारणाही केली आहे. मात्र, फक्त १५ टक्के निधी देण्याची तयारी 'एमआयडीसी'ने दाखवली आहे. दोन्ही महापालिकांनी प्रत्येकी १५ टक्के आणि राज्य सरकारने ७० टक्के निधी द्यावा, असे सूत्र असेल, असे मानले जात आहे. मात्र, सरकार ७० टक्के निधी देण्यास तयार नाही.

### सरकारची इच्छा पण...

»'पुरंदर विमानतळ उभारण्याची सरकारची इच्छा आहे. मात्र, त्यासाठी निधी सरकार मोठ्या प्रमाणात देऊ शकत नाही. त्यामुळे निधी कसा आणि कोठून उभा करायचा या विवंचनेत सध्या सरकार आहे. या संदर्भात निधीचा अभ्यास करण्यात आला आहे. समोर आलेल्या पर्यायांतून फारसे साध्य होत नाही. त्यामुळे विमानतळाचे घोडे अडले आहे,' असे मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### दृष्टिक्षेपात पुरंदर विमानतळ

- पुण्यापासून ४० ते ४५ किलोमीटरवर
- २,८३२ हेक्टर क्षेत्राचा विशेष डीपीआर
- २००० हेक्टर क्षेत्राची प्रत्यक्षात संपादनाची गरज
- भूसंपादनासाठीच चार ते पाच हजार कोटी रुपये लागण्याची शक्यता

# 'महावितरण'ची पुण्यात सर्वाधिक स्टेशन!

## राज्यात 62 चार्जिंग स्टेशन; पुण्यात सर्वाधिक 23 चार्जिंग स्थानकांचा समावेश

। पुणे । महाईन्यूज

**इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी 'महावितरण'ने राज्यात ६२ चार्जिंग स्थानके उभारली असून, त्यामध्ये पुण्यात सर्वाधिक २३ चार्जिंग स्थानकांचा समावेश आहे. या स्थानकांवर चार्जिंग करणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांची संख्या सातत्याने वाढत आहे.**

'महावितरण'च्या पुढाकाराने राज्यात एकूण ३२१४ चार्जिंग स्थानके उभारण्यात आली आहेत. त्यामध्ये महावितरणची स्वमालकीची ६२ चार्जिंग स्थानके आहेत.

राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी पायाभूत सुविधा उभारण्यास महावितरणला 'नोडल एजन्सी' म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. इव्ही चार्जिंग स्थानके वाढविण्यासाठी महावितरणने स्वतंत्र संकेतस्थळ कार्यान्वित केले आहे. त्याद्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे चार्जिंग स्थानक उभारण्यास चालना दिली जात असून, नव्या स्थानकांना सुलभ प्रक्रियेद्वारे तत्पर वीजजोडणी दिली जात आहे. याशिवाय महावितरणने 'पॉवरअप ईव्ही' हे मोबाइल ॲप्लिकेशन उपलब्ध करून दिले आहे. त्यातून इलेक्ट्रिक वाहनचालकांना जवळचे चार्जिंग स्थानक शोधणे, चार्जिंगसाठी लागणारा वेळ, वापरलेले वीज युनिट, व्यवहारासाठी वॉलेट आदी माहिती मिळत आहे, असे महावितरणतर्फे सांगण्यात आले.



### इव्ही चार्जिंग सुविधांसाठी महावितरणला पुरस्कार

» इव्ही चार्जिंगसाठी पायाभूत सुविधांच्या विकासात सर्वोत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल महावितरणला नवी दिल्ली येथे आयोजित 'ईव्ही चार्ज इंडिया' या परिषदेत पुरस्काराने गौरविण्यात आले. सोसायटी ऑफ मॅन्युफॅक्चरर्स ऑफ इलेक्ट्रिक व्हेईकल्स संस्थेचे सरचिटणीस अजय शर्मा यांच्या हस्ते महावितरणचे संचालक प्रसाद रेशमे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

### शहरनिहाय चार्जिंग स्टेशन

» पुणे - २३, ठाणे - ११ नवी मुंबई - १२, नागपूर - ६
नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती आणि सांगली शहरांत - प्रत्येकी १

# महापालिकेचा अजब कारभार!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने बक्षिसाची रक्कम विद्यार्थ्यांना दिली दोनवेळा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाने दहावी व बारावीतील २५० गुणवंत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर १० हजारांऐवजी दुप्पट २० हजार रुपये जमा केले आहेत. कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांना दोनवेळा बक्षिसाची रक्कम दिल्याने पालिकेला २५ लाखांचा आर्थिक फटका बसला आहे. रक्कम परत मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण, काही विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद मिळत नाही.**



महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या विविध कल्याणकारी योजनेद्वारे विद्यार्थी, महिला व नागरिकांना आर्थिक लाभ दिला जातो. दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर बक्षीस योजना आहे. दहावी व बारावीमध्ये मध्ये ९० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ हजार रुपये दिले जातात. तर, ८० ते ९० टक्के गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना दहा हजार रुपये दिले जातात. यासाठी विभागाच्या वतीने पात्र लाभार्थ्यांकडून दहावी, बारावीची गुणपत्रिका, आधारकार्ड, शहरात वास्तव्यास असल्याचा पुरावा, बँक खाते व पासबुक आदीची झेरॉक्स प्रत जमा करून घेतली जाते.

त्यानुसार, विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्च महिन्यामध्ये आर्थिक लाभ देण्यास सुरुवात होते. त्यासाठी विभागाने टप्प्याटप्प्याने बडोदा बँकेच्या पिंपरी शाखेत गुणवंत विद्यार्थ्यांची यादी दिली. त्यानुसार, विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली. मात्र, २५० विद्यार्थ्यांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये दोनदा पाठविण्यात आले. ती एकूण रक्कम तब्बल २५ लाख इतकी आहे. बँक खात्यावर २० हजार रुपये जमा झाल्याचे पाहून विद्यार्थी व पालक खुश झाले.

यंदा बक्षिसाची रक्कम वाढवल्याने इतकी रक्कम मिळाल्याचा त्यांचा समज झाला. ही बाब समजल्यानंतर समाज विकास विभागाला खडबडून जागा झाला.

रक्कम परत मिळविण्यासाठी समाज विकास विभागातील लिपिक व कर्मचाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना मोबाइलवर संदेश पाठवत जास्तीची रक्कम परत पाठविण्याची विनंती केली. काही विद्यार्थ्यांना फोन करून रक्कम परत करण्यास सांगण्यात आले. त्याला काही विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला आहे. तर काही विद्यार्थी प्रतिसाद देत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे संबंधित लिपिकांची अडचण झाली आहे. लिपिकाने विद्यार्थ्यांची यादी दोन वेळा बँकेत जमा केल्याने हा प्रकार घडला.

### लिपिकाच्या वेतनातून रक्कम वसूल करणार

» सर्व २५० विद्यार्थ्यांनी प्रत्येक दहा हजारांची रक्कम पुन्हा महापालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. मात्र, तसे न झाल्यास पालिकेस आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. ही रक्कम संबंधित लिपिक व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वसूल करण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात डिसेंबर महिन्यात २५० गुणवंत विद्यार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा केले होते. त्यानंतर मार्चमध्ये ६०० विद्यार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा करताना लाभ मिळालेल्या २५० विद्यार्थ्यांची यादीही बँकेत दिली गेली. त्यामुळे दोनवेळा खात्यावर पैसे गेले. आतापर्यंत १०७ विद्यार्थ्यांनी पैसे परत केले आहेत. याप्रकरणी या योजनेचे लिपीक आणि कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. -अजय चारठणकर, उपायुक्त समाज विकास विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पिंपरी-चिंचवडमधील नाट्यगृहांची भाडेवाढ!

## नवीन दरांची १ जुलैपासून अंमलबजावणी केली जाणार

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने नाट्यगृहांच्या भाड्यात दरवाढ केली आहे. नवीन दरांची १ जुलैपासून अंमलबजावणी केली जाणार आहे. कामगारनगरी, औद्योगिकनगरी अशी ओळख असलेल्या शहरात सांस्कृतिक चळवळ रुजत असतानाच या केलेल्या भरमसाठ दरवाढीमुळे चळवळीला 'खो' बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.**




चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे सभागृह, भोसरीतील अंकुशराव लांडगे नाट्यगृह, नवी सांगवी येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह आणि निगडी, प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर अशी पाच नाट्यगृहे महापालिकेने उभारली आहेत. या नाट्यगृहांत अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. खासगी सभागृहांपेक्षा वाजवी दर आहेत. त्यामुळे या नाट्यगृहात व्यावसायिक नाटक, राजकीय कार्यक्रम, शैक्षणिक संस्थेचे स्नेहमेळावा, इतर मेळावे, समारंभ, स्पर्धा, खासगी कार्यक्रम होत असतात. खर्चापेक्षा उत्पन्न कमी असल्याचे कारण देत महापालिकेने नाट्यगृहांच्या भाड्यात मोठी वाढ केली.

लांडगे नाट्यगृहाचे दर २०१२, अत्रे रंगमंदिराचे २००२ तर निळू फुले रंगमंदिराचे दर २०१७ पासून सुधारित करण्यात आलेले नाहीत. नाट्यगृहाचे वर्षाकाठी ५० ते ६० लाख उत्पन्न आहे, तर एक कोटी खर्च होत आहे. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या भाड्यात १७ वर्षांपासून वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ घालण्याच्या दृष्टिकोनातून नाट्यगृहांचे भाडेदर सुधारित केले आहेत. सुधारित दराची अंमलबजावणी १ जुलै २०२३ पासून केली जाणार आहे.

> नाट्यगृह उत्पन्नाचे साधन होऊ शकत नाहीत. सांस्कृतिक भूक अतिशय महत्त्वाची आहे. नाट्यगृहाचे भाडे लोकांना परवडेल. तज्ज्ञ लोकांशी चर्चा करूनच दरवाढीबाबत निर्णय घेणे अपेक्षित होते. प्रशासकांनी तुघलकी निर्णय घेऊ नयेत.
>
> - भाऊसाहेब भोईर, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा.

गदिमा नाट्यगृह भाडेतत्वावर

निगडी प्राधिकरणात ६६ कोटी रुपये खर्च करून उभारलेले निगडी, प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर (गदिमा) नाट्यगृह भाडेतत्वावर दिले जाणार आहे. हे नाट्यगृह भाडेतत्वावर देण्याची मागणी नागरिकांकडून 'अ' क्षेत्रीय कार्यालयाकडे केल्याचा दावा

### नवीन दर



» प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील वातानुकुलीत यंत्रणेसह मुख्य सभागृहासाठी तिकीट दर नसलेली मराठी नाटके, ऑर्केस्ट्रॉच्या तीन तासांसाठी आठ हजार रुपये, तिकीट असलेल्या कार्यक्रमांसाठी १२ हजार रुपये दर आहे. शाळांसाठी तीन तासांसाठी ३० हजार रुपये, महाविद्यालयांसाठी पाच तासांसाठी ४८ हजार आणि इतर संस्थांसाठी ६० हजार रुपये दर असणार आहेत. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, आचार्य अत्रे सभागृह, नवी सांगवी येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहातील वातानुकुलीत यंत्रणेसह मोफत मराठी नाटके, ऑर्केस्ट्रॉच्या तीन तासांसाठी सात हजार २०० रुपये, तिकीट असलेल्या कार्यक्रमांसाठी दहा हजार ८०० रुपये, शाळांना तीन तासासाठी २७ हजार रुपये, महाविद्यालयांना पाच तासासाठी ४३ हजार २०० रुपये, इतर संस्थांसाठी ५४ हजार रुपये भाडे असणार आहे. नाट्यगृहात रंगीत तालीम, सरावाठीचे दर कमी असणार आहेत.

> नाट्यगृहांचे भाडे खूप कमी होते. त्यामुळे लोकांना आवश्यक सोई-सुविधाही मिळत नव्हत्या. अनेक वर्षांनी भाड्यात वाढ केली आहे. मराठी नाटके, प्रयोग, शाळांच्या कार्यक्रमासाठी दर कमी ठेवले आहेत. इतर संस्थांची, उद्योजकांची भाडे भरण्याची क्षमता आहे. त्यांनी क्षमतेनुसार भाडे भरलेच पाहिजे.
>
> – शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# या मानसिकतेतून मराठ्यांनी बाहेर पडावे!




नांदेड जिल्ह्यातील बोन्ढार हवेली या गावात १ जूनच्या सायंकाळी अक्षय भालेराव या तरुणाची काही माथेफिरू मराठ्यांनी हत्त्या केली. कारण होते त्याने एवढ्या वर्षात प्रथमच गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. मराठवाड्यात नांदेड शहराला लागून असलेल्या या गावात राहणारा बहुसंख्य मराठा समाज अश्या पातळीवरचा खालचा विचार करीत असेल हे ऐकून मान शरमेने खाली जाते. आजच्या काळातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे वाद होतात आणि कुणाच्या तरी निष्पाप रक्ताने त्याचा शेवट होतो हे अतिशय गंभीर आहे. अक्षय भालेराव हा तरुण गावाच्या वंचित बहुजन आघाडीचा सक्रिय कार्यकर्ता आणि ग्राम शाखेचा पदाधिकारी होता. ज्याने आपल्या जगण्यात आत्मभान पेरले त्याचा उत्सव साजरा करताना अक्षयचा अश्या पद्धतीने बळी जावा ही घटना लोकशाहीचा गळा घोटणारी असून गावात अनुसूचित जातीने कसे वागले पाहिजे याचे नियंत्रण दाखविणारी आहे.

अक्षयच्या खुनामागे नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे मला माहित नाही मात्र माध्यमातून आजवर जे काही बाहेर आले त्यावरून असे दिसते की गावात आजवर कुणीही आंबेडकर जयंती साजरी करण्याचा प्रयत्न केला नाही आणि हा तरुण त्याचा खटाटोप करतोय हे सहन न झाल्यामुळेच त्याचा खून करण्यात आला आहे. पोलीस तपास सुद्धा तसेच सांगत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा त्यांची जयंती कुठेच वादग्रस्त विषय नसताना या गावात असे काय घडले की बहुसंख्य समाजाला या तरुणाला संपवले पाहिजे असे वाटले ? मला वाटते हा गेल्या काही वर्षातील सामाजिक प्रबोधनाचा पराभव म्हटला पाहिजे. मराठा सेवा संघाने गेल्या तीन दशकात दलित- सवर्ण यांच्यातील मोठी दरी कमी करण्यात मोलाची



भूमिका बजावली आहे. मराठ्यांच्या घराघरात आंबेडकर वाचले जावेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत आणि ज्यांनी आंबेडकर वाचले त्याचे डोके निकोप झाले आहे.

विदर्भ आणि मराठवाडा या भागातील दलित- सवर्ण वाद तीनचार दशकांपूर्वी अतिशय टोकाचा होता. गावोगाव या दोन वर्गात दंगली सतत सुरु असायच्या मात्र मधल्या काळात दोन्ही बाजूनी शिक्षण आणि समजूतदारपणा वाढला परंतु काही गाढव अजूनही आहेत त्याच घाणीत लोळताहेत त्याचे हे परिणाम आहेत असे वाटते. गावकुसाबाहेर राहणाऱ्या समूहाने आपल्या आज्ञा नेहमी पाळाव्यात आणि कायम आपल्या नियंत्रणाखाली असावे अशी मानसिकता आजही कुणी बाळगत असेल तर त्याला लोकशाही आणि संविधानाचा आरसा दाखविण्याची गरज आहे. आताच्या काळात तुमच्या खटल्यावर रोजंदारीने काम करणारा नोकर सुद्धा वाटेल ते सहन करीत नाही असे असताना कुण्या समूहाने आपली मनमानी गपगुमान सहन करावी असे कुणालाही वाटत असेल तर त्याने स्वप्नातून जागे होऊन वास्तवाचा सामना करायला हवा. पोटची मुले जिथे तुमचे ऐकत नाहीत अशावेळी कुणावर सत्ता गाजवताय ?

अडीच तीन हजार लोकवस्ती असलेल्या या गावात २०१६ ला १३ एप्रिलला भीम जयंतीच्या कार्यक्रमावर हल्ला झाला होता. बौद्धांनी कोणतीही मिरवणूक मुख्य रस्तावरुन नेऊ नये अशी आक्रस्ताळी भूमिका गावातील मराठा समाजाने आजवर घेतली होती मात्र फारूक अहमद सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी सामंजस्य घडवत दोन्ही समाजाच्या पाच बैठका घेऊन २९ एप्रिलला आंबेडकर जयंतीची मिरवणूक शांततेत पार पाडली. प्रथमच गावात मिरवणूक निघाली याचा राग काही लोकांच्या डोक्यात होताच त्याचा बदला १ जूनला घेण्यात आला. १ जूनला एका लग्नाच्या वरातीत मराठा समाजाचे तरुण नाचत असताना रस्त्यावरील दुकानात आलेल्या अक्षय भालेराव याला गाठण्यात येऊन शाब्दिक वाद झाला त्याचे पर्यवसान बेदम हाणामारीत झाल्यावर अक्षयला भोसकून ठार करण्यात आले. गेल्या तीन दिवसांपासून एकाही मराठा नेत्याने त्याचा निषेध करू नये याचे वाईट वाटते. दक्षिण नांदेड मतदार संघात हे गाव येते आणि मोहन हंबर्डे हे काँग्रेसचे मराठा आमदार त्याचे प्रतिनिधित्व करतात. अक्षय भालेराव या तरुणाची हत्त्या केल्यावर आरोपी काही वेळातच आमदारांच्या बंगल्यावर गोळा होतात याचा अर्थ न कळावा एवढी जनता आता मूर्ख राहिली नाही. मूठभर लोकांच्या स्वार्थापोटी जातीय वैमनस्यात संपूर्ण समाजाची समिधा टाकण्याची घाई बारी नाही. ज्या मराठा कार्यकर्त्यांनी २९ ला आंबेडकर जयंतीची मिरवणूक शांततेत पार पडण्यास सहकार्य केले त्याच लोकांनी पुढे येऊन आपल्या समाजातील आरोपींच्या मुसक्या आवळण्यास पोलिसांना मदत करून पुन्हाएखादा अक्षय त्याला बळी पडणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करायला हवी. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड यांनीही नव्याने प्रबोधनाची ग्रामीण भागात सुरुवात करायला हवी. गेल्या काही वर्षात सगळ्याच जाती आपल्यापुरत्या विचार करीत आहेत. कट्टरतेच्या कोशात त्यांनी आपल्याला बंदिस्त करून ठेवले आहे.

## संपादकीय »

### चीनचे नवे उड्डाण

***'अमेरिकादी देशांनी उभारलेल्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचा भाग नसल्याने, चीनने स्वत:चे स्वतंत्र स्थानक उभारले आहे.***

जगातील प्रथम क्रमांकाची महासत्ता व्हायची चीनची आकांक्षा लपून राहिलेली नाही. त्यासाठी प्रत्येक आघाडीवर यश मिळविण्याचे जीवतोड प्रयत्न तो देश करीत असतो. सध्या चीनने अंतराळ क्षेत्रात नवी भरारी घेण्यात यश मिळविले असून, तीन अंतराळवीरांना 'तियानगाँग' या नव्या अंतराळ स्थानकात पाठविले आहे.

या तिघांत एका सर्वसामान्य नागरिकाचा समावेश आहे. बीजिंगच्या बेइहांग विद्यापीठातील प्रा. गुई हाइचाओ यांच्या रूपाने चीनने प्रथमच सामान्य नागरिकाला अवकाशात पाठवले आहे. अन्य अंतराळवीरांमध्ये मोहिमेचे कमांडर जिंग हेपेंग यांचा समावेश असून, ते चौथ्यांदा अंतराळात जाणारे पहिले चिनी अंतराळवीर ठरले आहेत.

अंतराळवीर झू यांगझू यांचे हे पहिलेच उड्डाण ठरले आहे. मंगळवारी चीनच्या 'शेंझॉऊ १६' या अवकाशयानाचे यशस्वी प्रक्षेपण केले, तेव्हा अमेरिकेसोबत सुरू असलेल्या छुप्या अंतराळ स्पर्धेत चीनने एक पाऊल पुढे टाकले..

**'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्व्हेशन ऑफ नेचर'ने धोक्यात असलेल्या प्रजातींमध्ये गणना केलेल्या रेड पांडाचे दर्शन अरुणाचल प्रदेशात, तवांग जिल्ह्यात नुकतेच घडले. बांबूचे सेवन करणारा हा सस्तन प्राणी ईशान्य भारतातील हिमालयाच्या भागात प्रामुख्याने आढळतो.**

## रेड पांडाची शुभवार्ता

सीमावर्ती तवांग जिल्ह्यात हा दुर्मीळ रेड पांडा बहुधा पहिल्यांदाच आढळला आहे. या परिसराच्या जैवविविधतेच्या रक्षणाच्या दृष्टीने रेड पांडा महत्त्वाचा आहे.

आकाराने मांजरीपेक्षा किंचित मोठा, अस्वलासारखे केसाळ शरीर, लालसर-तपकिरी रंगाचे केस, काळ्या रंगाचे पोट, पाय आणि डोळ्यांवर; तसेच डोक्याच्या बाजूला पांढरा भाग ही रेड पांडाची शारीरिक वैशिष्ट्ये. प्रामुख्याने झाडांवर राहणारे रेड पांडा अतिशय कुशल, लवचिक हालचालींसाठी ओळखले जातात. लांब आणि केसाळ शेपटीचा उपयोग शरीराचा तोल सावरण्यासाठी; तसेच हिवाळ्यात अंगावर 'पांघरण्या'साठीही केला जातो. प्रामुख्याने शाकाहारी असलेल्या पांडाचे नाव 'पोन्या', म्हणजेच 'बांबू किंवा झाडपाला खाणारा प्राणी' या नेपाळी शब्दावरून पडल्याचे सांगितले जाते.



पूर्व हिमालयातील सिक्कीम राज्याचा रेड पांडा हा राज्य प्राणी आहे. या राज्यात दर वर्षी रेड पांडा महोत्सव होतो. जगभरातील निम्मे रेड पांडा पूर्व हिमालयाच्या भागात आहेत. मात्र, जंगलतोडीमुळे त्यांचा अधिवास असलेली झाडे आणि खाद्य असलेला बांबू धोक्यात आल्याने, या प्राण्याची संख्या वेगाने कमी होत आहे. जंगलांमध्येही एका विशिष्ट तापमानाच्या भागात रेड पांडा वास्तव्य करतात. मात्र, तापमान वाढत असल्याने, त्यांना सुयोग्य अधिवासासाठी अधिकाधिक उंचीवर स्थलांतर करावे लागत आहे. सिक्कीममधील रेड पांडांचा अधिवास असलेले ७० टक्के क्षेत्र संरक्षित क्षेत्राच्या बाहेर आहे. रेड पांडांच्या अस्तित्वासाठी या जंगलांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. म्हणूनच, तवांगमध्ये या प्राण्याचे दर्शन ही शुभवार्ता मानली जात आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः** *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सरकराची आवडती स्टंटबाजी!

## » ठाकरे गटानं सामना अग्रलेखातून मोदी सरकारवर सोडलं टीकास्त्र

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ओडिशामध्ये शुक्रवारी संध्याकाळी घडलेल्या भीषण तिहेरी रेल्वे अपघातामध्ये आत्तापर्यंत २८८ जणांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. या अपघातातील जखमींवर सध्या रुग्णालयांत उपचार चालू आहेत. मृतांच्या नातेवाईकांना सरकारकडून मदत जाहीर करण्यात आली आहे. अपघातस्थळी बचावकार्यही पूर्ण झालं असून लवकरच वाहतूक पूर्ववत होईल. मात्र, या अपघातामुळे उपस्थित झालेल्या प्रश्नांवर आता चर्चा चालू झाली आहे. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या भीषण दुर्घटनेला नेमकं कारणीभूत कोण? याच मुद्द्यावरून ठाकरे गटानं सामना अग्रलेखातून मोदी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे. शिवाय, वर्षभरापूर्वी मोदी सरकारने दिलेल्या आश्वासनाचीही आठवण करून दिली.**



“मोदी सरकारने रेल्वे अपघातविरोधी ‘संरक्षण कवचा’च्या टिऱ्या बडविल्या होत्या. मात्र बालासोरच्या रेल्वे अपघाताने त्याच्या ठिकऱ्या उडविल्या आहेत. २८८ प्रवाशांचा बळी घेणारा आणि ९००च्या वर प्रवाशांना जखमी करणारा हा अपघात कसा घडला याची प्राथमिक कारणे आता समोर येत आहेत. पुढील तपासात आणखी तपशील समोर येईल, पण शुक्रवारी संध्याकाळी घडलेल्या या अपघाताने आजही देशातील रेल्वे प्रवास असुरक्षित असून रेल्वे प्रवाशांचे जीवन क्षणभंगूर, बेभरोसे असल्याचे पुन्हा सिद्ध केले आहे”, अशी भूमिका ठाकरे गटाकडून घेण्यात आली आहे.

“दोन रेल्वेंमध्ये टक्कर होऊ नये यासाठी ‘संरक्षण कवचा’चा उदोउदो रेल्वेमंत्र्यांनी गेल्या वर्षी केला होता. हे संरक्षण कवच म्हणजे रेल्वे दुर्घटना रोखणारी मोठी क्रांती (भक्तांच्या भाषेत ‘मास्टर स्ट्रोक’) असून एकाच रेल्वेमार्गावर समोरासमोर ट्रेन्स आल्या तरी या संरक्षण प्रणालीमुळे त्या आधीच थांबतील आणि टक्कर टळेल असे सांगितले गेले होते. स्वतः रेल्वेमंत्र्यांनी त्याचे प्रात्यक्षिक दाखविले होते. मग तरीही शुक्रवारची भीषण रेल्वे दुर्घटना घडलीच कशी? कुठे गेले तुमचे ते ‘संरक्षण कवच’? जनतेला दाखविलेली ही ‘कवचकुंडले’ फक्त रेल्वेमंत्र्यांनी प्रात्यक्षिक दाखविलेल्या रेल्वे गाड्यांनाच होती, असे आता म्हणायचे का?” असा सवालही ठाकरे गटाकडून उपस्थित करण्यात आला आहे.

### “मोदी सरकारच्या ‘त्या’ दाव्यांवरच प्रश्नचिन्ह”

»“बालासोरचा अपघात मागील दोन दशकांतील सर्वात मोठा आणि भीषण म्हटला जात आहे. त्याहीपेक्षा मोदी सरकार आल्यापासून रेल्वेचा विकास आणि सुरक्षितता यासंदर्भात जे दावे ठोकले जात आहेत, त्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ही दुर्घटना आहे. बुलेट ट्रेन, ‘वंदे भारत’ ट्रेन्स असे रेल्वे विकासाचे बरेच फुगे गेल्या सहा-सात वर्षांत हवेत सोडले गेले. त्या सर्व फुग्यांमधील हवा शुक्रवारच्या अपघाताने

### “...तर कदाचित अपघात टळला असता”

»“संरक्षण कवचाचा वापर टप्प्याटप्प्याने वाढवत नेला जाईल, या तुमच्या आश्वासनाचे काय झाले? अपघातग्रस्त गाड्यांना ती प्रणाली असती तर कदाचित शुक्रवारची भयंकर दुर्घटना टळली असती आणि अनेकांचे प्राण वाचले असते. मात्र सरकारच्या सुरक्षित रेल्वे प्रवासाच्या या क्रांतीचे बिगुल बालासोरमधील अपघातग्रस्तांच्या किंकाळ्या, आक्रोश, मरणप्राय वेदना आणि दुःखावेगात विरून गेले आहेत. संरक्षण कवचाचे ते प्रात्यक्षिक म्हणजे ‘मास्टर स्ट्रोक’ वगैरे नव्हता, तर मोदी सरकारची आवडती ‘स्टंटबाजी’ होती असे कोणी म्हटले तर त्यावर सरकारकडे काय उत्तर आहे?” असाही प्रश्न अग्रलेखात उपस्थित करण्यात आला आहे.

---

# “मोदी दिवसातून पाचवेळा ड्रेस बदलतात...

## » ओडिशा रेल्वे अपघातावरून काँग्रेसचा मोदींवर हल्लाबोल

। नवी दिल्ली । महाईन्यूज

**काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदींचा रेल्वे अपघाताची पाहणी करतानाचा एक व्हिडीओ पोस्ट करत मोदींवर दिवसातून पाचवेळा ड्रेस बदलल्याचा आरोप केला आहे.ओडिशात कोरोमंडल एक्स्प्रेसच्या भीषण अपघातात २८८ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर शेकडो प्रवासी जखमी झाले. यानंतर विरोधकांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या राजीनाम्याची मागणी केली.**





आता काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदींचा रेल्वे अपघाताची पाहणी करतानाचा एक व्हिडीओ पोस्ट करत मोदींवर दिवसातून पाचवेळा ड्रेस बदलल्याचा आरोप केला आहे. केरळ काँग्रेसच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून याबाबत ट्वीट करण्यात आलं.

### “तिनदा ड्रेस बदलला म्हणून गृहमंत्र्यांनी राजीनामा दिलेला”

या ट्वीट मालिकेत काँग्रेसने इतिहासाची उजळणी करत नैतिक जबाबदारी घेऊन राजीनामा देणाऱ्या काँग्रेस नेत्यांची माहिती दिली. काँग्रेसने म्हटलं, “२००८ मध्ये मुंबई हल्ल्यानंतर तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांनी दिवसभरात तिनदा ड्रेस बदलला म्हणून त्यांच्यावर टीका झाली. यानंतर शिवराज पाटलांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला.”

### “पुतण्यावर रेल्वे बढतीतील घोटाळ्याच्या आरोपानंतर राजीनामा”

“२०१३ मध्ये रेल्वेमंत्री पवन कुमार बंसल यांच्या पुतण्यावर रेल्वे बोर्डाच्या बढती प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचा आरोप झाला. त्यानंतर पवन कुमार बंसल यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. सीबीआयने केलेल्या तपासात या आरोपांमध्ये तथ्य सापडलं नाही, तरीही त्यांनी आपल्या पदाचा त्याग केला,” असंही काँग्रेसने नमूद केलं.

यावेळी काँग्रेसने लालबहादूर शास्त्रींचंही उदाहरण दिलं. ते म्हणाले, “१९५६ मध्ये तामिळनाडूमधील रेल्वे अपघातानंतर तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्रींनी राजीनामा दिला. त्यांनी या अपघातातील १४२ मृत्यूंची नैतिक जबाबदारी स्वीकारत हा राजीनाम्याचा निर्णय घेतला.” “आजची परिस्थिती पाहिली, तर आपल्याला असा पंतप्रधान मिळाला आहे जो दिवसातून पाचवेळा ड्रेस बदलतो. ओडिशात भारताच्या इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात भीषण रेल्वे अपघात झाला. यानंतरही रेल्वेमंत्री आणि पंतप्रधान नेहमीप्रमाणे नाटक करत आहेत. सत्तेत असणाऱ्यांचं बेजबाबदार वर्तन पाहणं त्रासदायक आहे. देशाच्या विकासासाठी आणि सुरक्षिततेसाठी नेतृत्व आणि पारदर्शकता महत्त्वाची आहे. मात्र, सध्या त्याची कमतरता काळजीत टाकणारी आहे,” असंही काँग्रेसने म्हटलं.

### काँग्रेसने ट्वीट केलेल्या व्हिडीओत नेमकं काय?

»काँग्रेसने ट्वीट केलेल्या एका व्हिडीओत पंतप्रधान नरेंद्र मोदी अधिकाऱ्यांबरोबरच्या बैठकीत ओडिशा रेल्वे अपघाताची माहिती घेताना दिसत आहेत. हा व्हिडीओ ट्वीट करताना केरळ काँग्रेसने म्हटलं, “सध्याच्या परिस्थितीकडे पाहिलं, तर आपल्याला असा पंतप्रधान मिळाला आहे जो दिवसातून पाचवेळा ड्रेस बदलतो.”

# गौरी ते हंपी चित्रपटः सोनालीचा कौतुकास्पद प्रवास



सोनाली कुळकर्णी यांचे नटरंग चित्रपटातील “अप्सरा आली” हे गाणे खूप प्रसिद्ध झाले. तसेच क्षणभर विश्रांती, अजिंठा नटरंगणि झपाटलेला २ मध्ये सुद्धा प्रसिद्ध झाल्या. सोनाली यांनी मितवा चित्रपटा मध्ये स्वप्नील जोशी आणि प्रार्थना बेहेरे बरोबर काम केले.

सोनाली कुलकर्णी यांचा जन्म १८ मे १९८८ ला पुण्याजवळील खडकी येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मनोहर आणि आई सविंदर असे होते. तिचे वडील मनोहर कुलकर्णी एक सेवानिवृत्त लष्करी डॉक्टर आहेत ज्यांनी ३० वर्षांपासून सैन्य मेडिकल सेंटरची सेवा केली आहे. तिची आई, सविंदर हे पंजाबी आहे जे देहू रोड, पुणे येथे कॉडसाठी काम करतात. त्यांनी लष्करी शाळेत, केंद्रीय विद्यालय मध्ये शिक्षण घेतले आणि फर्ग्युसन महाविद्यालयातून पुण्यातील मास कम्युनिकेशन आणि जर्नालिझममध्ये पदवी प्राप्त केली. इंदिरा स्कूल ऑफ कम्युनिकेशनमधून जनसंवाद क्षेत्रात पदव्युत्तर पदवी मिळविली आहे. नटरंगनंतर, सोनाली यांनी अजिंठा चित्रपटात अभिनय केला, आणि आणखी एक चित्रपट “क्षणभर विश्रांती”, भरत जाधव, हेमंत ढोमे, सचित पाटील, मानवा नाईक यांच्यासह. त्यानंतर केदार शिंदेच्या इरादा पाक्क यांच्या पुढच्या प्रकाशनात त्यांनी सिद्धार्थ जाधव यांच्यासमवेत अद्येची भूमिका निभावली. तिने झी मराठीवर “चला हवा येहू” कॉमेडी शोमध्ये देखील काम केले आहे.

# 'करिअरच्या शिखरावर असताना मुलीला जन्म देण्याचा निर्णय घेणं म्हणजे..' आलिया भट्ट



आलिया भट्ट ही बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. गेले वर्ष तिच्यासाठी खूप खास होते. तिने केवळ बॉयफ्रेंड रणबीर कपूरसोबत लग्नच केले नाही तर ती पहिल्यांदा आईही बनली आहे. आलिया भट्टने मुलीला जन्म दिला. आलिया भट्टने लग्न करून लगेच आई होण्याचा निर्णय घेतला तेव्हा जो तो ते कळल्यावर हैराण झाला होता. करिअरच्या शिखरावर असताना अभिनेत्रीचा हा निर्णय सगळ्यांसाठीच शॉकिंग होता.सहसा बॉलिवूड अभिनेत्री त्यांच्या करिअरच्या शिखरावर असताना लग्न करणे टाळतात. याबाबत प्रत्येकाची धारणा वेगळी असते. आलिया भट्टने नुकतीच एका इंग्रजी वेबसाईटला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने चित्रपट कारकिर्दी व्यतिरिक्त वैयक्तिक आयुष्याविषयी देखील मनमोकळा संवाद साधला. यादरम्यान आलिया भट्टला विचारण्यात आले की, 'तिने करिअरच्या शिखरावर असताना लग्नाची घाई का केली आणि आई होण्याचा निर्णय इतक्या लवकर का घेतला?' यावर आलिया म्हणाली, "होय, करिअरच्या शिखरावर पोहोचल्यानंतर मी लग्न करून आई होण्याचा निर्णय घेतला. पण लग्न करून किंवा आई झाल्यावर माझ्या कामावर त्याचा परिणाम होईल असे कोणाला वाटते? आणि तसं झालं तरी मला त्याची पर्वा नाही. एक कलाकार म्हणून माझा स्वतःवर विश्वास आहे. तुम्ही मेहनत केलीत, आणि चांगले कलाकार असाल तर तुम्हाला काम मिळेल. शेवटी हा तुमचा वैयक्तिक प्रश्न असतो तुम्हाला कधी काय करायचे आहे". याशिवाय आलिया भट्टने इतरही अनेक गोष्टी केल्या आहेत.

# बॉलिवूडची 'शेरनी' आहे कोट्यवधींची मालकीण



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री विद्या बालनचा. विद्यानं अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केलं. तिच्या साडी लूकला अनेकांची पसंती मिळते. साडी आणि विद्याचं खास नातं आहे. कोणत्याही पार्टीला किंवा पुरस्कार सोहळ्याला विद्या ही तिच्या साडी लूकमध्ये हजेरी लावते. विद्या तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. जाणून घेऊया विद्याचे चित्रपट आणि तिच्या संपत्तीबाबत....

## विद्याचे चित्रपट

विद्याचा जन्म 1 जानेवारी 1978 रोजी झाला. विद्यानं मुंबईमध्ये एन्थोनी गर्ल्स स्कूलमध्ये शिक्षण घेतले. तिने 2005 मध्ये प्रदर्शित झालेल्या परिणीता या चित्रपटामधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. या चित्रपटात विद्यानं ललिताची भूमिका साकारली होती. याशिवाय तिने द डर्टी पिक्चरमध्ये सिल्कची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील विद्याच्या अभिनयाचं सर्वसामान्य प्रेक्षकांसोबतच समीक्षकांनीही कौतुक केलं. शेरनी या चित्रपटामध्ये विद्या बालनने प्रमुख भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये विद्या फॉरेस्ट ऑफिसरच्या भूमिकेत दिसली होती. या चित्रपटाचे कथानक मानव आणि प्राणी यांच्यावर अधारित आहे. हा चित्रपट ओटीटी प्लॅटफोर्मवर प्रदर्शित झाला होता. लगे रहो मुन्नाभाई, तुम्हारी सुल्लू आणि बेगम जान या चित्रपटामधील विद्याच्या अभिनयाचं देखील अनेकांनी केलं.

## विद्याची संपत्ती


विद्या जवळपास 134 कोटी संपत्तीची मालकीण आहे. तिच्याकडे 14 कोटींचे अपार्टमेंट देखील आहे. विद्याकडे मर्सिडीज-बेंजसारख्या आलिशान गाड्या देखील आहेत.

विद्या सोशल मीडियावर सक्रिय असते. विविध लूकमधील फोटो ती सोशल मीडियावर शेअर करत असते. तसेच वेगवेगळ्या गाण्यांचे, डायलॉग्सचे मजेशीर व्हिडीओ देखील ती सोशल मीडियावर शेअर करते.

# ‘जरा हटके जरा बचके’ चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ

विकी कौशल आणि सारा अली खान यांचा ‘जरा हटके जरा बचके’ चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. चित्रपट शुक्रवारी २ जून रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला. पहिल्या दिवशी पाच कोटी रुपयांची कमाई करणाऱ्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. वीकेंडला चित्रपटाच्या कमाईत वाढ झाली आहे.

‘जरा हटके जरा बचके’मध्ये पहिल्यांदाच विकी कौशल आणि सारा अली खान यांची जोडी



मोठ्या पडद्यावर पाहायला मिळाली आहे. या दोघांची केमिस्ट्री प्रेक्षकांना आवडली आहे, त्यामुळे चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करत आहेत. ‘जरा हटके जरा बचके’ने पहिल्याच दिवशी ५.४९ कोटी रुपयांचा गल्ला जमवला होता. वीकेंडला कमाईत वाढ झाल्याचं पाहायला मिळालं. शनिवारी चित्रपटाने ७.२५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला होता. आता रविवारची आकडेवारीही समोर आली आहे. ‘सॅकनिल्क’च्या सुरुवातीच्या ट्रेड रिपोर्टनुसार, ‘जरा हटके जरा बचके’ ने रिलीजच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारी ९ कोटी रुपये कमावले आहे. या चित्रपटाच्या ओपनिंग वीकेंडची एकूण कमाई आता २१.६९ कोटी रुपये झाली आहे.

# ऑस्ट्रेलियाचं टेन्शन वाढलं!

## कोहलीविरोधात प्लॅनिंग सुरू,पॉंटिंगनं दिला इशारा

। लंडन ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



**।भारताविरुद्धच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम लढतीसाठी ऑस्ट्रेलिया संघ सज्ज झाला आहे. मैदानावरील तयारीसोबतच ऑस्ट्रेलियाने भारताच्या विराट कोहलीला झटपट रोखण्यासाठी योजना आखली आहे; कारण ऑस्ट्रेलियासाठी विराट नेहमीच डोकेदुखी ठरला आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीला सात जूनपासून लंडनमधील 'दी ओव्हल' स्टेडियममध्ये सुरुवात होत असून या आव्हानात्मक लढतीत भारताला आव्हानात्मक ऑस्ट्रेलियाचा सामना करायचा आहे.**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात येत्या ७ जूनला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची लढत होणार आहे. या लढतीसाठी ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी विराट कोहलीविरुद्ध रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

भारताने जसे ऑस्ट्रेलिया संघाचा अभ्यास करून डावपेचांचे नियोजन केले आहे. आपल्या संघातील शिलेदारांना भूमिका वाटून दिल्या आहेत. तशीच लगबग ऑस्ट्रेलिया संघातही सुरू असून शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा यांच्यासह विराट कोहलीची विकेट झटपट मिळविण्यासाठी ऑस्ट्रेलियाने खास डावपेच आखले आहेत. रोहित शर्मा-शुभमन गिल या सलामी जोडीनंतर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस येऊ शकतो. मागील काही कसोटींत कोहलीची कामगिरी भलेही साजेशी झालेली नाही. मात्र, यावर्षीच्या इंडियन प्रीमियर लीगद्वारे (आयपीएल) विराटने चमकदार कामगिरी करून 'फॉर्म' परत मिळवला आहे. तांत्रिकदृष्ट्या टी-२० आणि कसोटी हे दोन्ही प्रकार वेगळे असले, तरी अनुभवी विराट कोहलीला परिस्थितीशी जुळवून घेणे पटकन जमते, याची जाणीव ऑस्ट्रेलियाला आहे. त्यानुसार ऑस्ट्रेलियासाठी कोहलीला रोखणे महत्त्वाचे असल्याचे ऑस्ट्रेलियाचा फलंदाज स्टीव्ह स्मिथने अलीकडेच सांगितले. याआधी गेल्याच आठवड्यात रिकी पॉंटिंगनेही ऑस्ट्रेलियाला विराटबाबत सजग केले आहे. या वर्षी जानेवारीत मायदेशात झालेल्या चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत कोहलीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १२, ४४, २०, २२, १३, १८६ धावा केल्या आहेत. गेल्या वर्षात मात्र कोहलीचा कसोटीचा फॉर्म हरपला होता. त्याला गेल्या वर्षी सहा कसोटींत केवळ २६५ धावा करता आल्या होत्या. यात केवळ एका अर्धशतकाचा समावेश होता.

मात्र, कोहलीने आयपीएलमध्ये १४ सामन्यांत ५३.२५च्या सरासरीने ६३९ धावा केल्या आहेत. यात दोन शतकांचा समावेश आहे.

### विराट कोहलीने लावले कामाला

लंडन: भारताविरुद्धच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम लढतीसाठी ऑस्ट्रेलिया संघ सज्ज झाला आहे. मैदानावरील तयारीसोबतच ऑस्ट्रेलियाने भारताच्या विराट कोहलीला झटपट रोखण्यासाठी योजना आखली आहे; कारण ऑस्ट्रेलियासाठी विराट नेहमीच डोकेदुखी ठरला आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीला सात जूनपासून लंडनमधील 'दी ओव्हल' स्टेडियममध्ये सुरुवात होत असून या आव्हानात्मक लढतीत भारताला आव्हानात्मक ऑस्ट्रेलियाचा सामना करायचा आहे.

भारताने जसे ऑस्ट्रेलिया संघाचा अभ्यास करून डावपेचांचे नियोजन केले आहे. आपल्या संघातील शिलेदारांना भूमिका वाटून दिल्या आहेत. तशीच लगबग ऑस्ट्रेलिया संघातही सुरू असून शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा यांच्यासह विराट कोहलीची विकेट झटपट मिळविण्यासाठी ऑस्ट्रेलियाने खास डावपेच आखले आहेत. रोहित शर्मा-शुभमन गिल या सलामी जोडीनंतर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस येऊ शकतो. मागील काही कसोटींत कोहलीची कामगिरी भलेही साजेशी झालेली नाही. मात्र, यावर्षीच्या इंडियन प्रीमियर लीगद्वारे (आयपीएल) विराटने चमकदार कामगिरी करून 'फॉर्म' परत मिळवला आहे. तांत्रिकदृष्ट्या टी-२० आणि कसोटी हे दोन्ही प्रकार वेगळे असले, तरी अनुभवी विराट कोहलीला परिस्थितीशी जुळवून घेणे पटकन जमते, याची जाणीव ऑस्ट्रेलियाला आहे. त्यानुसार ऑस्ट्रेलियासाठी कोहलीला रोखणे महत्त्वाचे असल्याचे ऑस्ट्रेलियाचा फलंदाज स्टीव्ह स्मिथने अलीकडेच सांगितले. याआधी गेल्याच आठवड्यात रिकी पॉंटिंगनेही ऑस्ट्रेलियाला विराटबाबत सजग केले आहे. या वर्षी जानेवारीत मायदेशात झालेल्या चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत कोहलीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १२, ४४, २०, २२, १३, १८६ धावा केल्या आहेत. गेल्या वर्षात मात्र कोहलीचा कसोटीचा फॉर्म हरपला होता. त्याला गेल्या वर्षी सहा कसोटींत केवळ २६५ धावा करता आल्या होत्या. यात केवळ एका अर्धशतकाचा समावेश होता. मात्र, कोहलीने आयपीएलमध्ये १४ सामन्यांत ५३.२५च्या सरासरीने ६३९ धावा केल्या आहेत. यात दोन शतकांचा समावेश आहे.

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा:

# जोकोव्हिच,अल्कराझ उपांत्यपूर्व फेरीत!

## मुचोव्हा व ओन्स जाबेऊर यांनी गाठली पुढची फेरी

। पॅरिस ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आघाडीचा टेनिसपटू सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिच व अग्रमानांकित कार्लोस अल्कराझने आपली विजय लय कायम राखताना फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. याच गटात कारेन खाचानोव्ह, नॉर्वेच्या कॅस्पर रुड व जर्मनीच्या आलेक्झांडर झ्वेरेव यांनी आगेकूच केली. महिला गटात चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हा व ट्युनिशियाची ओन्स जाबेऊर यांनी पुढची फेरी गाठली.**




पुरुष एकेरीच्या सामन्यात तिसऱ्या मानांकित जोकोव्हिचने पेरुच्या जुआन पाब्लो वारिलासला ६-३, ६-२, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच जोकोव्हिचने आक्रमक खेळ करताना वारिलासला पुनरागमन करण्याची कोणतीच संधी दिली नाही व विजय साकारला. उपांत्यपूर्व फेरीत जोकोव्हिचसमोर ११व्या मानांकित कारेन खाचानोव्हचे आव्हान असेल. अल्कराझने आपली लय कायम राखताना इटलीच्या लॉरेंझो मुसेट्टीवर ६—३, ६—२, ६—२ असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवत उपांत्यफेरीतील आपली जागा निष्ट्रिद्धR(१५५)त केली. खाचानोव्हने इटलीच्या लॉरेंझो सोनेगोला १-६, ६-४, ७-६ (९-७), ६-१ असे नमवले.

अन्य सामन्यात चौथ्या मानांकित रुडने चीनच्या झँग झिझेनला ४-६, ६-४, ६-१, ६-४ असे पराभूत करत पुढची फेरी गाठली. तर, झ्वेरेवने १२व्या मानांकित अमेरिकेच्या फ्रान्सेस टिआफोवर ३-६, ७-६ (७-३), ६-१, ७-६ (७-५) असा विजय नोंदवला. महिला गटात मुचोव्हाने एलिना अवानेस्यानवर ६-४, ६-३ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. अनास्तासिया पावलुचेनकोव्हाचे एलिस मर्टेन्सला ३-६, ७-६ (७-३), ६-३ असा पराभव करत आगेकूच केली. अन्य लढतीत, जाबेऊरने सर्बियाच्या ओल्गा डॅनिलोव्हिचला ४-६, ६-४, ६-२ असे नमवले. तर, ब्राझीलच्या बीट्रिज हद्दाद माइआने एकतरिना अलेक्झांड्रोव्हावर ५-७, ६-४, ७-५ अशी मात केली.

# सौदी लीगसाठी बेन्झिमाचा रेयाल माद्रिदला अलविदा

। माद्रिद ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



फ्रान्सचा आघाडीचा फुटबॉलपटू करिम बेन्झिमा स्पेनच्या आघाडीच्या क्लबमध्ये सहभागी असलेल्या रेयाल माद्रिदचे पुढील हंगामापासून प्रतिनिधित्व करणार नाही. रविवारी रेयाल माद्रिदने या आघाडीपटूसोबतचा करार पुढे वाढवला नाही. जवळपास १४ वर्षे रेयाल माद्रिदकडून खेळणारा बेन्झिमा सौदी अरेबियाचा क्लब अल इतिहादकडून खेळण्याची शक्यता आहे. त्या संघासोबत ८ अब्ज रुपयाहून अधिक (१०० मिलियन युरो) करार करणार असल्याची चर्चाही समोर येत आहे.

हा हंगाम बेन्झिमासाठी फारसा चांगला राहिलेला नाही. त्याला दुखापतीमुळे कतार येथे झालेल्या विश्वचषक स्पर्धेत फ्रान्सच्या राष्ट्रीय संघात सहभाग नोंदवता आला नाही. बेन्झिमा आणखी एक हंगाम संघासोबत राहील असे वाटत होते. मात्र, सौदी अरेबियाच्या क्लबने दिलेल्या प्रस्तावामुळे त्याला निर्णय बदलण्यास भाग पाडले असल्याची चर्चा आहे. "रेयाल माद्रिद क्लब आणि आमचा कर्णधार करिम बेन्झिमा यांनी एक चांगली आणि अविस्मरणीय भागिदारी संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला आहे.